# राहूल अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी
# 'माझे पाचवे अपत्य'



**श्री. शंकर (नाना) बबन भुजबळ,**
**संचालक**

जुन्नर तालुक्यातल्या शिरोली गावांत १-३-१९४७ रोजी माझा जन्म झाला. आई, वडील, चार भाऊ असे आमचे भुजबळ कुटुंब. परंतु आमची आर्थिक स्थिती अत्यंत हालाखीची, शेती अगदीच तुटपुंजी शेतीचा तुकडा आमच्या वाट्याला आला होता. गावात सगळ्यांचीच शेती जिराईती त्यांत पाण्याचा तुटवडा पावसाने कृपादृष्टी केली तरच पिके शिवारांत डोलणार आमच्याकडे तर शिवारही नव्हते. टीचभर जमिनीचा तुकडा त्यामुळे गरीबी पांचवीला पूजलेली. पोट भरण्याचे साधनच आमच्याकडे नव्हते. शेवटी परिस्थितीला कंटाळून माझ्या वडीलानी आणि थोरल्या भावाने 'मुंबई नगरी बडी बाका' अशा मुंबईची वाट धरली. वडील माझगांव मधल्या एका गिरणीमध्ये तर भाऊ दुसऱ्या गिरणीमध्ये कामगार म्हणुन नोकरी करु लागले. पण तिथेही पगार तुटपुंजा. खोलीचे भाडे, खाणवळ ह्यांच्या खर्चाला तो अपुरा पडे. त्यामुळे गांवी घराकडे दहा-वीस रुपये धाडणेही शक्य नव्हते. मुंबईहुन येणारी मनिऑर्डर हे आमच्या कुटुंबासाठी स्वप्न होते. पण पहाटेचे खरे ठरणारे स्वप्न नव्हते.

स्वत:ची धडशेती नाही, उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे शिरोलीत असलेल्या आम्हां चौघांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी माझी आई दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी करत असे, पाण्याच्या घोटाबरोबर शिळी भाकरी पोटांत ढकलायची असे 'उदरभरण' असायचे. भाकरीबरोबर कोरड्यांस काहींच नसायचे. कधीतरी शेरडू-बकऱ्यांचा आवडता पाला, तांदुळजा, त्या तांदूळज्याची भाजी असायची, मात्र श्रावणी सोमवार आमच्यासाठी सणाचा दिवस असायचा. त्या दिवशी आमच्या घरांत मूठभर तांदूळाचा भात शिजे, आणि भाताबरोबर एखादी पालेभाजी आणि भजीही असत.

कधीतरी जुन्नरला, तालुक्याच्या गावी जायला मिळे. तिथे बाजारात हॉटेलं होती. हॉटेलात गिऱ्हाईकाची वर्दळ असायची. भजी,बटाटेवडे, चिवड्यावर ती गिऱ्हाईक ताव मारायची. मी लांबूनच हे बघत रहायचो. कधी जत्रेला गेलो तर चुलत्यांच्या बैलगाडीतून जायचो, पण जत्रेतल्या गमती-जमतींचा आनंद मला कधीच घेता आला नाही. चुलत्यांच्या बैलगाडीतून प्रवास करताना मला नेहमी एक दिवास्वप्न दिसायचे, आपल्याकडेही खिल्लारी बैलजोडींची बैलगाडी असावी पण स्वप्नं खरी करायची असली तर नुसतं हातावर हात धरुन बसण्यांत काही अर्थ नाही. हे त्या वयात मला उमजलं.

दरम्यानच्या काळात मी सातवीची परीक्षा पास झालो. गरीबीमुळे पुढचे शिक्षण शक्यच नव्हते. शिवाय हायस्कुल तालुक्याच्या गावीपण मग पुढे करायचं काय ? हा प्रश्नच होता. अचानक संधी मिळाली.

आमचे एक नातेवाईक वसंतराव झोडगे मुंबईत भाजीच्या धंद्यात होते. त्यांनी मुंबईला बोलावून घेतले. सन १९६१-६२ सालची गोष्ट अंगात सदरा आणि चटेरापटेरी अर्धी चड्डी अशा वेशात मी मुंबईत आलो. शिरोलीबाहेर कधी न गेलेला मी मुंबई शहर बघून बावचळून गेलो. वय जेमतेम पंधरा वर्षे. पण रोजगार मिळाला. भायखळा मार्केटमध्ये हमाली काम,दीड रुपया रोज, रहायला फुटपाथ, आंघोळ सार्वजनिक नळावर. अशीच काही वर्ष काढली. माझा प्रमाणिकपणा, मेहनत फळाला आली. सदानंदशेठ घरत यांना माझ्यातला बकूब ओळखला, मी विश्वासू असल्याची त्यांची खात्री पटली आणि मला बढती मिळाली. माझ्यावर खरेदी, विक्रीचे व्यवहार सोपवले. मार्केटमध्ये येणारी भाजी उतरवून वजन करुन घ्यावी लागे, वजनासाठी इंग्लीश काटा वापरत होते. काट्यावर वजन करुन भाजीचे डाग छातीशी धरुन गाळ्यात रचाव्या लागायच्या. माझ्या हातांना, कसे ते माहीत नाही. सरावाने असेल पण गोणीच्या वजनाचा अदमास यायचा. मापात पाप असल्याचा संशय मनात होता. मी बोलुन दाखवला, त्यावरुन हंगामा झाला. वजनांत, मापातल्या हेराफेरी दिसली कि मला राग यायचा. मी त्याबद्दल आवाज उठवला. सांज लोकसत्तेत त्याबद्दल काही छापून आले. मीही जिद्दीला पेटलो. नोकरी गेली तरी पर्वा नव्हती. पण आपला दाम खरा आहे तर घाबरायचे नाही ही जिद्द होती. माझ्यामुळे मार्केटचे नाव खराब होत आहे. अशा तक्रारी करुन काहींनी मला अडकवण्याचा प्रयत्न केला. व्यापारी संघाचे पदाधिकारी

अरुणशेठ भुजबळ, मा. छगन भुजबळ, भायखळा मार्केटचे अध्यक्ष ह्यांच्या पर्यंत तक्रारी केल्या. पंचनामा करण्याचे ठरले. माझे हितचिंतक आणि मित्र उस्मानशेठ अब्बासभाई यांचा माझ्यावर विश्वास होता. त्यांनी इंग्लिश वजन काट्याच्या कंपनीतील माणसांना बोलावून काट्यांची तपासणी केली आणि काट्यांत दोन किलोची तफावत असल्याचे सिद्ध केले. तीस किलोचा माल बत्तीस किलो दाखवला जायचा ते पाहून सगळ्यानांच धक्का बसला. पण सत्य उघडकीस आले. माझा संशय खरा ठरल्याचे सिद्ध झाले आणि अरुणशेठ पाटील यांनी मला शाबासकी दिली. सगळ्याच व्यापाऱ्यांचे नुकसान टळले.

ह्या प्रसंगाने माझा प्रामाणिकपणा, सचोटी सिद्ध झाली. मालक शंकरशेठ मेहेर माझ्यावर बेहद्द खुष झाले आणि त्यांनी मला मेहेर मार्केटमध्ये एका कोपऱ्यातली पण मोक्याची जागा मला दिली. मार्केटमध्ये जिथे दीडदोन फूट जागा मिळणे अशक्य होते, तिथे मला पाचसहा फुट जागा मिळाली. शिवाय त्यांनी दलालीचे लायसन्स अरुणशेठ पाटील ह्यांच्या मदतीने मिळवून दिले तर माझ्यासाठी श्री. नथुशेठ झोडगे यांनी जामिनदारी आणि जबाबदारी घेतली. कष्ट, प्रामाणिकपणा, विश्वासूपणा माझ्या अंगी असलेल्या ह्या गुणांमुळे आणि आईच्या आशीर्वादाने मी माझ्या पायांवर व्यापारांत जम बसवू लागलो. या धडपडीत प्रयत्नांत दहा वर्षे निघून गेली. १९७२ साली मी खोलीत राहू लागलो. फूटपायरी सुटली पण फूटपायरीवर झोपताना मी पाहिलेल्या स्वप्नातून मात्र माझी सूटका झाली नव्हती. माझ्या डोळ्यांत मी ती खरी होईपर्यंत जपणार होतो.

मार्केटमध्ये स्वत:चा गाळा मिळाला. दलालीचे लायसन्सही मिळाले. प्रश्न होता भांडवलाचा. सचोटी, प्रामाणिकपणा आणि विश्वास पंधरा वीस वर्षांच्या कष्टानंतर माझी एवढीच मिळकत होती माझे भांडवल होते. परंतु भाजी खरेदी-विक्रीसाठी ते पुरेसे नव्हते. माझा व्यवहार चोख आणि आदर्श होता. तरीही आर्थिक व्यवहारासाठी दोन-तीन पर्याय तेव्हा असत. भगवतीमल मारवाडी, तसेच महात्मा फूले सोसायटी सारख्या पतपेढ्या होत्या. माझ्यासारख्या नवस्थाची तिथे दाद लागणं जरा कठीणच होते. धंद्याच शिवधनुष्य उचलायचे तर मारवाड्याकडून सोसायटीमधून उचल घेणे भाग होते, परंतु मार्केटमध्ये माझी असलेली पत आणि नातेवाईकांच्या मध्यस्थीने माझ्या आर्थिक विवंचना धंद्यापुरत्या तरी मिटल्या. मी जोमाने कामाला लागलो. माझे शिक्षण फारसे नव्हते तरी धंद्याचे गणित मला उत्तम जमले मी धंद्यात स्थिरस्थावर झालो. आमदनी ही वाढली. माझ्या आजोबांनी विकलेल्या आमच्या गावाकडंच्या जमिनी विकत घेतल्या. विहीरही परत मिळवली. काही वर्षातच भरभराट झाली. वसूलीसाठी कधी कधी रोहा, पेणला जायला लागायचे. तर वसईतल्या कळम गावांतल्या भाजीचा सौदाही ठरवू लागलो. त्यानिमित्ताने नविन ओळखी व्हायच्या, बऱ्याच जणांशी गाठीभेटी व्हायच्या त्यातून मी माणसे जोडली आणि माणसांची पारखही झाली.

मी ज्या परिस्थितीत भांडवल उभारले, त्याच्या परतफेडीसाठी मला आणि त्या काळातल्या अनेकांना अव्वाच्या सव्वा व्याज भरावे लागले. यापेक्षा काही वेगळा मार्ग नाही का? असा माझ्या मनांत प्रश्न आला? त्यावर विचार करु लागलो. त्या विचाराचा भुंगा सतत माझ्या डोक्यात घोंगावू लागला. परंतू उचल घेऊन भांडवलाची तरतूद करणाऱ्या माझ्यासारख्या व्यापाऱ्यांसाठी आम्ही काही जणांनी (आमच्या सर्वांच्या विचाराने व मार्गदर्शनाखाली) **"विजयानंद फंड"** स्थापन केला. सुरुवातीला कमिटीचे अकरा सभासद होते. काही वर्षांनी हा फंड वाढत जाऊन बावीस जणांचा झाला. आमचा फंडाचा अनुभव, आमचा संपर्क, आमचा व्यापार व व्यवहार पाहून आमचे मित्र श्री. गणेश जाधव यांनी माझे मित्र श्री. सहादूशेठ शेरकर व मला त्यांच्या "शिवशक्ती पतसंस्थेवर" संचालक मंडळावर घेतले पण सोसायटीच्या कारभारात खीळ बसू लागली. विचारांचा, मतांचा ताळमेळ जमेना, व्यवहारातली पारदर्शकता गडद होऊ लागली. त्यामुळे माझा आणि माझे मित्र सहादूशेठ शेरकर दोघांचा जीव त्या वातावरणात धुसमटुं लागला. सहादूशेठ ही प्रामाणिकपणा सचोटी ह्या गुणांवर फुलांच्या व्यापारातले नावाजलेले व्यापारी. व्यवहारातला गलथानपणा त्यांना सहन होत नसे. अशा वातावरणांत रहाण्यापेक्षां कटुपणा येऊ न देता गोडीनेच आम्ही सोसायटीतून दूर झालो.

माझ्या डोक्यांत सोसायटी काढायची हा भुंगा पुन्हां गुंजाख करायला लागला मुंबईतील गावकऱ्यांसाठी सोसायटी काढायची असा मनांत विचार आला. सहादूशेठ शेरकरांच्या मनातही असा विचार होता. काही मित्रांबरोबर ह्या विषयी चर्चा केली तर त्यांचे मत पडले की सहकार क्षेत्रात काम करणे आम्हांला झेपण्यासारखे नाही. थोडक्यात अप्रत्यक्षपणे त्यांनी सुचवले की असं धाडस करण्याची क्षमता आमच्यात नाही. आमचा आवाका तितका नाही. त्या शब्दांनी आम्हांला आव्हान दिलं होतं. कचखाऊपणा माझ्या स्वभावांत नाही. जिद्दीला पेटून ते आव्हान स्वीकारायचंच असं ठरवलं.

आता ध्यानी मनी सोसायटीचा ध्यास होता. व्यापार उदीम सांभाळून जितका म्हणून वेळ मिळेल, त्या वेळांत आम्ही सभासदांची नोंदणी सुरु केली. आप्तस्वकीय, नातेवाईक, गांवकरी यांना आम्ही सोसायटीचे उद्दीष्ट पटवून दिले. पाचशे पंचविस सभासदांची नोंदणी केली. सोसायटी स्थापन करणे,रजिस्ट्रेशन करणे अशा कामांसाठी धावपळ तर केलीच, प्रसंगी पदरमोडही केली.

माननीय खासदार निवृत्तीशेठ शेरकर आमचे प्रेरणास्थान होते. त्यांच्या आशीर्वादाने आणि पाठीब्यांने आम्ही नव्या सोसायटीचे २९/१/१९९० रोजी रजिस्ट्रेशन करुन मुहूर्तमेढ रोवली. शुभांरभ झाला. **"राहूल अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई"** असे सोसायटीचे नामकरण सर्वानुमते करण्यात आले.

सोसायटीचे रजिस्ट्रेशन ही कायदेशीरबाब पूर्ण झाली. सरकारदरबारी, कागदेपत्री सोसायटी अस्तित्वात आली पण ती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यासाठी दोन-अडीच महिन्यांचा अवधि लागला. ऑफिससाठी जागा शोधणे. फर्निचरची व्यवस्था इतर काही सोयी मार्गी लावणे आवश्यक होते. जागेची अडचण श्री. दिनेश भाई नाईकांनी निवारली. भायखळ्यातच त्यांनी जागा मिळवून दिली. बाकी काही अडचणी आल्या तेव्हा श्री. भवानी शंकर शेट्टी व श्री. चंदूभाई तलाजिया ह्यांचे पाठबळ मिळाले.

१ एप्रिल १९९० ला सोसायटीचा उद्घाटन समारंभ झाला. त्या समारंभासाठी आदरणिय श्री. निवृत्तीशेठ शेरकर, मा. विलासराव देशमुख, श्री. दिलीप वळसे पाटील, श्री. बी. डी. झुटे, श्री थोरवे मास्तर हे आमच्या स्नेहाखातर आवर्जून उपस्थित होते. **राहूल अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीचे** कामकाज जरी एक एप्रिलला सुरु झाले, तरी आजतागायत म्हणजेच २५ वर्षे सोसायटीने ठेवीदारांना वा कर्जदारांना एप्रिल फूल केले नाही. संचालक मंडळाचे सर्व सदस्य एकदिलाने, एकमताने, वैयक्तीक संघर्ष, मतभेद बाजूला ठेवून सोसायटीच्या उत्कर्षासाठी झटत असतात. सर्व निर्णय बिनविरोध, सविस्तर चर्चा आणि एकमुखाने घेतले जातात. मुदत ठेवीदारांची ठेवीची रक्कम व त्यावरचे व्याज, मुदतठेव संपेल त्याचदिवशी अदा करण्याची प्रथा आहे. सुरुवातीपासुनच सोसायटीचा हा प्रघात आहे. तो कटाकक्षाने पाळला जातो. ठेवीदारानी विन्मुख होऊन परत जाऊ नये म्हणून ५% व्याजाने तजवीज केली. सोसायटीचा पसारा वाढला आणि त्यावेळची जागा अपुरी पडू लागली. तेव्हा सहादूशेठ शेरकरांनी पुढाकार घेऊन ते रहात असलेल्या लक्ष्मी बिल्डींग मध्ये सोसायटीसाठी जागा नक्की केली आज तिथेच आमचे मुख्य कार्यालय आहे. आजमितीला आमच्या सात शाखा आहेत, त्याही स्वमालकीच्या. आमच्या चोख, प्रमाणिक कार्याच्या त्या पताका आहेत.

सहकार क्षेत्र हे आमचे काम नव्हे, अशी शंका उपस्थित करणारे शंकासुरही आतां कौतुक करुं लागले. कालाय तस्मैः नमः! असच म्हणावं लागेल. तरी त्यांच्या कौतुकाने आम्ही फुशारुन गेलो नाही. कारण मुदतठेवी मिळवणं आम्हाला जड गेल नाही. प्रश्न होता आप्तस्वकीय, नातेवाईक, मित्र ह्यांना कर्जवाटप केल्यानंतर कर्जवसूलीचा. कर्जाचे थकीत हप्ते वसूल करण्यासाठी आम्ही कोर्टकचेरी, वकीलाच्या नोटीसा, खटले शक्यतो टाळता येतील का असा प्रयत्न करत असू. कर्जवसूली हे जरा अवघड जागेचे दुखणे होते. ज्यांना कर्ज दिले होते ते गोतावळ्यातलेच असत. धाकदपटशा दाखवून कर्ज वसूल करणे हे निदान माझ्या स्वभावात नव्हते. अशा वसूलीसाठी माझ्या भूतकाळातल्या दोन आठवणी आहेत. त्याच मला पुढे उपयोगी आल्या..

पहिला प्रसंग अगदी सुरुवातीला जेव्हा मी मार्केटमध्ये रोजंदारी करत होतो. तेव्हा डोक्यावर ओझे घेऊन येणाऱ्या इसमास माझा चुकून धक्का लागला. खरतर मार्केटमधल्या अपुऱ्या जागेत जी लगबग चालते त्या लगबगीत,गर्दीत धक्का लागणे ही काही गंभीर बाब नव्हती,पण त्या ओझेवाल्याला राग येणं सहाजिक होत. तो संतापून मला काही बोलला, मी शांत राहिलो, त्याची माफी मागितली. तर तो शांत होऊन माझ्याशी प्रेमाने बोलला म्हणाला,"भाऊ, ओझेवाल्याला त्रास होणार नाही एवढच बघ''. दुसरा प्रसंग-मी माझ्या एका खरेदीदाराकडे वसूलीसाठी गेले होतो. त्याची ऊधारी थकली होती. मी त्याच्यासमोर जाऊन बसलो. तो ही काहीबाही कारणे सांगू लागला. तेव्हा मी त्याला सांगितले, "मला लाफा मार". तो गांगरला, म्हणाला शेठ कशासाठी ? मी त्याला बोललो, "अरे बाबा, तुला उधारीत" माल देऊन. मी चूक केली. त्या चूकीची शिक्षा मला व्हायला हवी, तेव्हा मला लाफा मार म्हणजे यापुढे मी कुणाला माल द्यायचा ह्याची काळजी घेईन. तर ह्या प्रसंगांमुळे मी शिकलो की वसूलीसुध्दा प्रेमाने करायला हवी.

सोसायटीचे ऑडीट, कायदेशीर वसूली वगैरे कायदेशीरबाबतीत आम्ही थोडे अनभिज्ञच होतो. त्यासाठी आम्ही बँकींग क्षेत्रातले आमचे गांवकरी श्री. बाजीराव थोरवे ह्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्या सोसायटीला ऑडीटर्सनी नेहमीच उत्तम शेरा दिला. तसेच त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमची कर्जवसूली जवळजवळ शंभर टक्के तसेच पुर्ण होत आहे.

या पंचवीस वर्षात माझी वैयक्तीक भरभराट झालीच, माझे संपूर्ण कुटुंब आर्थिक दृष्टया सदृढ होईल यांची काळजी मी घेतली. राहूल सोसायटी सुध्दा माझ्या कुटूंबाचा अविभाज्य भाग आहे. हे कुटूंबसुध्दा भक्कम आर्थिक पायावर उभे राहील यांची काळजी मी आणि सोसायटीच्या समस्त संचालक मंडळाने घेतली. आम्ही एक दिलाने, एक मताने गेली पंचवीस वर्षे या कुटुंबाचा सांभाळ अतिशय निःस्वार्थपणे करत आलो वसूलीच्या प्रसंगी नाईलाजास्तव आम्हांला कटुता पत्करावी लागली. अन्यथा आमचे सगळे व्यवहार अत्यंत पारदर्शक आणि गोडीगुलाबीत सुरु आहेत. ह्या पुढे त्यांत खंड पडणार नाही. मार्च २०१४ अखेर आमचा **नफा रु. २५,०५,८३१.१२** आहे. २५ वर्षांपूर्वी आम्ही सहकार क्षेत्रात काम करु शकणार नाही- अशा शंकासुरांना आमचा सचोटीचा कारभार,चोख व प्रामाणिक व्यवहार हेच उत्तर आहे.

माझ्या कौटुंबिक आणि सोसायटीच्या जबाबदऱ्या मी माझ्या आईच्या आशीर्वादाने, तसेच माझी पत्नी सौ. भागूबाई (नानी) चार मुले ह्यांच्या पाठबळावर यशस्वीपणे पेलल्या.

माझी चार मुले आता प्रौढ झाली आणि ती स्वतःच्या जबाबदाऱ्या पेलण्यास समर्थ आहेत. राहुल हे माझे पाचवे अपत्य आहे - त्यानेही वयाच्या पंचविशीत मोठ्या दिमाखाने पाऊल टाकले आहे. ह्या अपत्याची उत्तरोत्तर प्रगती होईल असा मला विश्वास आहे. त्याच्या प्रगतीत, भरभराटीतच माझे समाधान आणि निखळ आनंद आहे.

आपणा सर्वांना नववर्षाच्या **हार्दिक शुभेच्छा !**

शब्दांकन

**शशांक वेचलेकर**

डोंबिवली